श्री. मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर
यांना पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

**अहिल्यानगर जिल्हा परिषद**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/२२६६६०१/१२५/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेनुसार**

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम ३
२. शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.कार्या-२/आस्था-२ १२२/२०२६ दिनांक ०४/०२/२०२६

ज्याअर्थी, श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, हे शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कार्यरत असताना त्यांनी कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठाच्या आदेशाचा अवमान करणे, अशाप्रकारचे गैरवर्तन केलेले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणारी आहे. श्री. चोभे हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग झालेला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे उक्त श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश आमलात राहील तेवढया कालावधीत श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांचे मुख्यालय ....पंचायत समिती कर्जत.... येथे राहिल.

आणि श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना ....गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत.... यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल तसेच ते निंलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत निंलबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल त्या-त्या वेळी त्यांनी खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी सादर करावे.

निलंबानाचे कालावधीत श्री.मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गटविकास अधिकारी, पं.स. कर्जत हे करतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20260309040052 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-03-2026 14:17:53
(आनंद भंडारी,भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति**

श्री मनोज पोपट चोभे, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर
**द्वारा व प्रत:-** शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रत:-** मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. अहिल्यानगर
**प्रत:-** गटविकास अधिकारी, पं.स. कर्जत
**प्रत:-** निवड नस्ती